# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 30 June 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: ३० जून २०२४ दुपारी १.०० वा.**

****

देशात नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत ६५ कोटी मतदारांनी मतदान केलं असून ही  जगातील सर्वात मोठी निवडणूक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.ते आज आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमात बोलत होते. हा या कार्यक्रम मालिकेचा एकशे अकरावा भाग होता. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त `एक पेड माँ के नाम` ही विशेष मोहिम सुरु करण्यात आली असून आपल्या भाषणात पंतप्रधानांनी पर्यावरणाचं महत्व विशद केलं.आपल्या आईच्या नावानं स्वतः वृक्षारोपण केल्याचं सांगत पंतप्रधानांनी देशवासियांना आपल्या आईसोबत किंवा तिच्या नावानं एक झाड लावण्याचं आवाहन केलं आहे. या मोहिमेमुळं आपल्या आईच्या सन्मानासोबतच पृथ्वीचंही रक्षण होईल, असंही ते म्हणाले.

आकाशवाणीच्या संस्कृत बातम्यांचं प्रसारण सुरु होऊन ५० वर्ष पूर्ण झाली असून या वार्तापत्रानं असंख्य लोकांना संस्कृतीशी जोडून ठेवल्याचं सांगत पंतप्रधानांनी आकाशवाणीचं अभिनंदनही केलं. जगन्नाथ पुरी इथली रथयात्रा, अमरनाथ यात्रा तसंच पंढपूरची वारी सुरु झाली आहे. यामध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. भारतीय भाषा, कला, साहित्य आणि वारसा याद्वारे संस्कृतीचा जगभरात झालेल्या गौरवाचाही त्यांनी मन की बात मधून उल्लेख केला. जगातल्या कानाकोपऱ्यात योग दिवस साजरा झाल्याचं सांगत आयुष्यात सकारात्मक बदलांसाठी नियमित योगासनं करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

****

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वषचक स्पर्धेत भारतानं दक्षिण अफ्रिकेवर सात धावांनी रोमहर्षक विजय मिळवत विश्वविजेतेपद पटकावलं. त्यामुळं देशभरात ठिकठिकाणी विजयोत्सवही साजरा करण्यात आला. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोनवरुन खेळाडूंशी संवाद साधत त्यांचं अभिनंदन केलं. अंतिम सामन्यातल्या विराट कोहलीच्या फलंदाजीचं, जसप्रित बुमराहच्या गोलंदाजीचं, सूर्यकुमार यादवनं घेतलेल्या अप्रतिम झेलासह, हार्दीक पांड्या आणि कर्णधार रोहित शर्मा यांचंही पंतप्रधानांनी कौतूक केलं.

****

अमरनाथ यात्रेचा काल शुभारंभ झाला. पहिल्याच दिवशी १३ हजारांहून जास्त भाविकांनी शिवलिंगाचं दर्शन घेतलं. जम्मू इथल्या भगवतीनगर यात्रेकरू निवासस्थानातून सुमारे ६ हजार, ६१९ भाविक नव्यानं यात्रेसाठी आज रवाना झाले असून येत्या १९ ऑगस्टपर्यंत ही यात्रा सुरु राहणार आहे.

****

आषाढी वारीत वारकऱ्यांच्या प्रबोधनासह शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्याच्या सांस्कृतिक विभागाचे दोन चित्ररथ वारीत सहभागी होत आहेत. या उपक्रमाचा प्रारंभ मुंबई इथं सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आला. आस्था- अस्मितेचं प्रतिक असलेल्या पंढरपूर वारीला वैशिष्ट्यपूर्ण अध्यात्मिक वारी म्हणून जागतिक नामांकन मिळण्यासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठविणार असल्याचं मुनगंटीवार यावेळी म्हणाले.

****

नाशिक जिल्ह्यातल्या गंगापूर धरणात फक्त १७ टक्के पाणीसाठा सध्या शिल्लक आहे. यामुळं नजीकच्या कश्यपी प्रकल्पातून गंगापूर धरणात कालपासून पुन्हा विसर्गाला सुरूवात झाली. तत्पूर्वी कश्यपी इथल्या प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी पाणी सोडण्यास विरोध केला होता. या पार्श्वभुमीवर जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्यासोबत ग्रामस्थांची बैठक झाली, त्यानंतर धरणात पाणी सोडण्यात आलं.

****

सोयाबीनच्या बियाणांची उगवणक्षमता तपासूनच शेतकऱ्यांनी ते पेरणीसाठी वापरावं असं आवाहन पुणे जिल्हा कृषी पर्यवेक्षक रोहन शेटे यांनी केलं आहे. सर्वसाधारण ७५ ते शंभर मिलिमिटर पाऊस झाल्यावरच सोयाबीन पेरावं तसंच कीडरोग प्रतिबंध आणि उत्पादन वाढीसाठी बीजप्रक्रियाही करावी, असंही ते म्हणाले.

****

कोकण, मध्य महाराष्ट्रासह विदर्भात आज मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

दरम्यान, आठवड्याच्या विश्रांतीनंतर वाशिम जिल्ह्यातील कारंजा, मानोरा, वाशीम, रिसोड, मालेगांव तालुक्यातील काही गावांत पावसाचं आगमन झालं. येत्या बुधवारपर्यंत कोकणास गोवा आणि मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी पावसाची तिव्रता वाढणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

****

पुणे एक्सप्रेस आणि निजामाबाद डेमू रेल्वे गाड्यांच्या मार्गात तात्पुरता बदल करण्यात आला आहे. मध्य रेल्वेच्या पुणे विभागांतर्गत दौंड - मनमाड रेल्वे मार्गावरील विकासकामांसाठी लाईन ब्लॉक घेतल्यानं हा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार, निजामाबाद -पुणे डेमू रेल्वे आज आणि उद्या एक जुलै रोजी परभणी, परळी, लातूर, कुर्डुवाडी मार्गे धावेल तर दौंड-निजामाबाद डेमू रेल्वे उद्या कुर्डुवाडी, लातूर, परळी, परभणी मार्गे धावेल. तसंच, पुणे - नांदेड एक्सप्रेस आज आणि उद्या दौंड, कुर्डुवाडी, लातूर, परळी, परभणी मार्गे धावेल. तर, नांदेड - पुणे एक्सप्रेस याच दोन्ही दिवशी परभणी, परळी, लातूर, कुर्डुवाडी, दौंड मार्गे धावणार आहे.

****

इंडोनेशियात आयोजित बॅटमिंटन अशियाई कनिष्ठ गट विजेतेपद स्पर्धेत भारतीय संघानं मिश्र सांघिक प्रकारात उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.

****